Shanti Education Society's
**A. G. Patil Polytechnic Institute, Solapur**
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: contact@agppi.edu.in Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/23-24-OTO-SY&TY/2023-24/020 Date: 22.08.2023

## अतिमहत्वाची सुचना : शैक्षणिक वर्ष २०२३-२४
## उन्हाळी परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी देण्याबाबत..

संदर्भ : १. मरातंशिमं / क्र-५१ / एकवेळ संधी / २०२३ / ५५७०, दि. १७.०८.२०२३.
२. मरातंशिमं / क्र-४० (परीक्षा विभाग) / F०९ / २०२३ / ४३५, दि. २१.०८.२०२३.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या परीक्षा नियमावलीतील तरतुदीनुसार जे विद्यार्थी उन्हाळी-२०२३ परीक्षेच्या निकालाअंती पुढील सत्र किंवा वर्षाकरिता प्रवेशास अपात्र ठरले आहेत; अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या हितास्तव एक विशेष बाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी “एक वेळ संधी” देण्यात आली आहे.

**सबब, सदर संधीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संदर्भ क्र. ०२ च्या परीपत्रकातील निर्देशानुसार मंडळाच्या संकेतस्थळावरील संस्थेच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन नोंदणी सोमवार, दि. २८.०८.२०२३ पर्यंत करणे अनिवार्य आहे; अन्यथा संधीचा लाभ घेता येणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

तसेच **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता एक वेळ संधी अंतर्गत द्वितीय किंवा तृतीय वर्षात सत्रकर्म पूर्ण करण्याकरीता प्रवेश घेऊ ईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक विहित नमुन्यातील अर्ज व हमीपत्र आणि महाविद्यालय स्तरावरील प्रवेश अर्ज व छापील बॅंक स्लिप महाविद्यालय कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आले असून संबंधीतांनी मंडळाचे विहित नमुन्यातील अर्ज व हमीपत्र भरून खाली नमुद आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयीन प्रवेश अर्जासोबत कार्यालयात श्री. मोफरे ए. व्ही. यांचेकडे सोमवार, दि. २८.०८.२०२३ पर्यंत सादर करून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी व आपला प्रवेश निश्चित करावा, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

टिप :

१. एक वेळ संधीकरीता आवश्यक नोंदणी शुल्क रू. २००/- महाविद्यालयाच्या लेखा विभागात भरावे.

२. फी चार्टप्रमाणे लागू होणारी कॉलेजची फी खाली नमुद पर्यायांचा वापर करून भरता येईल :

अ. फी भरण्यासाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत :

- 'बँक ऑफ बडोदा', डफरीन चौक रेल्वे लाईन्स, सोलापूर (ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष बँकेत फी जमा करणे)
- महाविद्यालय कार्यालयात फी भरण्याची सुविधा.

ब. Bank Details for NEFT, RTGS & Online Transfer :

| | |
|---|---|
| **Account Name** | **: Principal, A. G. Patil Polytechnic Institute, Solapur** |
| **Bank Name** | **: Bank of Baroda** |
| **Branch** | **: Railway Lines, Solapur** |
| **Account Number** | **: 10140200000163** |
| **IFSC Code** | **: BARB0RAISHO (Fifth Character is Zero)** |
| **MICR Code** | **: 413012003** |

३. शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत देण्यात आलेले शिष्यवृत्ती अर्ज हे अर्जावर नमुद आवश्यक कागदपत्रांसह प्रवेश अर्जासोबत महाविद्यालय कार्यालयात जमा करावे.

❖ ऑनलाईन नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रे :

१. विहित नमुन्यातील विनंती अर्ज.

२. विहित नमुन्यातील हमीपत्र .

A. G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE * SOLAPUR *

डॉ. एस. ए. चौगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्युट
सोलापूर.

प्रत :

| | | |
|---|---|---|
| 1. CE | 2. CO | 3. EE |
| 4. EJ | 5. ME | 6. GS |
| 7. Student Section: | 1. Mr. Mophare A. V. | 2. Mr. G. N. Dhokate |
| | 3. Mr. V. A. Kadam | |
| 8. Account Section | | |
| 9. Instt. Web Portal | | 10. Admin. |

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२१००

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक**

क्र. मरातंशिमं/का-५१/एकवेळ संधी/२०२३/५५६०
दिनांक :- 17 AUG 2023

प्रति,
प्राचार्य,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यता प्राप्त
अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- उन्हाळी परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करुन देणेबाबत..**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यता प्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या उन्हाळी परीक्षा २०२३ च्या निकालानुसार मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील तरतुदीनुसार पुढील सत्र/वर्षाकरिता प्रवेशास अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सदर सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी हितास्तव एक विशेष बाब म्हणून एक वेळ संधी देण्याबाबत नियामक परिषदेच्या दि. १७.०८.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मंडळाच्या परीक्षा नियमावली नियम RG४(C) नुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यता प्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील उन्हाळी परीक्षा २०२३ च्या निकालानंतर पुढील वर्षात प्रवेशाकरीता अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता पुढील सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यास विद्यार्थी हितास्तव अपवादात्मक परिस्थितीत खालील अटीच्या अधिन राहून एक विशेष बाब म्हणून एक वेळ संधी (One Time Opportunity) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१. ज्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२३ करीता दुसरे व चौथे सत्र मंडळाच्या परीक्षा नियम RG-6 नुसार पूर्ण केले आहे असे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकवेळ संधीचा लाभ घेण्यास पात्र राहतील.
२. सदरची एक वेळ संधी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सत्रकर्म पूर्ण करून घेण्यासाठीच आहे. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील तिसरे व पाचवे सत्र जे विद्यार्थी मंडळाच्या परीक्षा नियम RG-6 नुसार पूर्ण करतील त्यांनाच अनुक्रमे चौथ्या व सहाव्या सत्रात प्रवेश देण्यात येऊन सत्रकर्म पूर्ण करून घेण्याची संधी द्यावी.
३. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील तिसऱ्या व पाचव्या सत्रात सत्रकर्म पूर्ण न केल्यामुळे जे विद्यार्थी थोपवले जातील (Detained/ Disallowed) त्यांनी संधी गमावली आहे, असे समजण्यात यावे व त्यांना अनुक्रमे चौथ्या व सहाव्या सत्रात प्रवेश देऊ नये.
४. हिवाळी परीक्षा २०२३ मध्ये मागील सत्र/वर्षाच्या अनुत्तीर्ण विषयांत जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील व मंडळाच्या परीक्षा नियमावलीनुसार पुढील सत्र/वर्षाकरिता प्रवेशास पात्र होतील त्यांना उन्हाळी परीक्षा २०२४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील तिसऱ्या व चौथ्या/पाचव्या व सहाव्या सत्राची परीक्षा देण्यास पात्र राहतील.
५. उन्हाळी परीक्षा २०२३ दरम्यान ज्या विद्यार्थ्यांना गैरप्रकार प्रकरणी (१+१) (Applied on Enrollment Number) शिक्षा झालेली आहे, असे विद्यार्थी सदर एक वेळ संधीकरीता अपात्र राहतील.

६. एक वेळ संधीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या Log-in मध्ये उपलब्ध केली जाईल. एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांचे संस्थेने मंडळाच्या Online प्रणालीद्वारे Registration करणे बंधनकारक राहिल. तसेच मंडळाच्या विभागीय कार्यालयाने Registration निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांनाच एक वेळ संधी देण्यात येईल. याबाबतचे सविस्तर परिपत्रक स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

७. एक वेळ संधी केवळ सत्रकर्म पूर्ण करून घेण्यासाठीच असल्याने अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यार्थी परिक्षेस बसण्यास पात्र होईपर्यंत भरून घेण्यात येऊ नये याबाबत योग्य ती दक्षता घेणेची जबाबदारी संस्थेची राहील. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घेऊन त्यांना परीक्षेत बसविल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल व विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८. एक वेळ संधीमुळे एका विशिष्ट वर्गात विद्यार्थी संख्या जास्त झाल्यास नियमित तसेच सदर संधी प्राप्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता संस्थेने वेगळा वर्ग तयार करुन शैक्षणिक कामकाज पूर्ण करावे.

९. एक वेळ संधी मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील. या विद्यार्थ्यांचे अर्ज अभिलेखे (Record) ठेवणेची जबाबदारी संस्थेची आहे. तसेच असे रेकॉर्ड आवश्यकतेनुसार सादर केले जाईल असे हमीपत्र संस्थेने देणे आवश्यक आहे.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी सत्र पूर्ण केलेले आहे त्यांनी संबंधीत विषयाचे Termwork/Journal /Drawing/Assignments जतन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. परीक्षेत पात्र झाल्यावर Oral/Practical परीक्षेचे वेळी सदर Termwork/Journal /Drawing/ Assignments सादर करणेची जबाबदारी सदर विद्यार्थ्याची राहील.

११. प्रथम व द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापन प्रक्रीया (Remideal Coaching) राबविणे बाबत.

- प्रथम व द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांचे आकलन सुयोग्यप्रकारे होण्याच्या दृष्टीने अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता विषयनिहाय अतिरीक्त अध्यापन वर्ग संस्थास्तरावर आयोजित करावे. सदर वर्गास विद्यार्थ्यांची उपस्थिती राहण्याकरीता संबंधित अध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.
- उपचारात्मक अध्यापन शनिवार/रविवार किंवा नियमित वेळापत्रका व्यतिरीक्त दररोज एक/दोन जादा तासिका घेवुन करण्यात यावी.
- उपचारात्मक अध्यापन करण्यासाठी वेळापत्रक निर्धारित करुन परिपत्रकाद्वारे विद्यार्थ्यांनी त्याची माहिती द्यावी व संस्थेच्या संकेतस्थळावर वेळापत्रक प्रसिद्ध करावे.
- संस्थास्तरावर उपचारात्मक अध्यापन प्रक्रीया राबविण्यासाठी संस्थेतील अनुभवी अध्यापकाची समन्वयक म्हणुन प्राचार्यांनी नेमणुक करावी.
- उपचारात्मक अध्यापन प्रक्रीयेसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, व्हिडीओ, नोट्स संस्थेतील अध्यापकांमार्फत तयार करण्यात यावेत.
- उपचारात्मक अध्यापनाकरीता विद्यार्थ्यांकडुन कोणतेही शुल्क आकारण्यात येवु नये.
- उपचारात्मक अध्यापनाच्या प्रगतीचा प्राचार्यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा. तसेच विद्यार्थ्यांकडुन फिडबॅक घेवून संबंधित अध्यापकांना याबाबत सुचना/ मार्गदर्शन करावे.

- उपचारात्मक अध्यापनाकरीता जे विद्यार्थी उपस्थित राहतील त्यांची हजेरी घेण्यात यावी. सदर दस्तावेज अध्यापकांनी जतन करावेत.
- उपचारात्मक अध्यापन प्रक्रीया राबविण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील यांची नोंद घ्यावी.
- संस्थाप्रमुखांनी राबविलेल्या उपचारात्मक अध्यापन प्रक्रीयेचा एकत्रित अहवाल संबंधित विभागीय कार्यालयांचे उपसचिव यांच्याकडे सादर करावा.

१२. एक वेळ संधी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: विद्यार्थ्यांना/ पालकांना याबाबत संपूर्ण मार्गदर्शन करावे व उपरोक्तनुसार याबाबतची अंमलबजावणी करावी.

( डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

१. प्राचार्य, पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व स्वायत्त संस्था.
२. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर .

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१८८/११०

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा. क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F०९/२०२३/435 दिनांक – 21 AUG 2023

**महत्त्वाचे परीपत्रक**

प्रति,

**प्राचार्य,**

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था**

विषय – **उन्हाळी परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी घेणा-या विद्यार्थ्यांसाठी "OTO Registration" वेळापत्रक**

संदर्भ – मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/एकवेळ संधी/ २०२३/५५७०, दि. १७/०८/२०२३

उपरोक्त संदर्भीय महत्त्वाच्या परिपत्रकान्वये मंडळाच्या परीक्षा नियमावली नियम RG४(C) नुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उन्हाळी परीक्षा-२०२३ च्या निकालानंतर पुढील सत्र/वर्षात प्रवेशाकरीता अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता सदर द्वितीय व तृतीय वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यास एक वेळ संधी (One Time Opportunity) उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

एक वेळ संधी साठी पात्र असणा-या विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या Login मध्ये "AY २०२३-२४ OTO Registration" या लिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संस्थेने एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांचे Registration ऑनलाईन पध्दतीने खालील वेळापत्रकानुसार करावे.

| अ. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १. | संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज, हमीपत्र व शुल्क विद्यार्थ्यांकडून स्विकारून संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध लिंकद्वारे OTO विद्यार्थ्यांचे Registration करणे | दि. २१ ते २८ ऑगस्ट, २०२३ |
| २. | विभागीय कार्यालयांनी संस्थेने Confirm केलेल्या OTO विद्यार्थ्यांची एकत्रित यादी, संस्थाप्रमुखांचे विहीत नमुन्यातील हमीपत्र व एकूण शुल्क स्विकारून अंतिमतः विद्यार्थ्यांचे अर्ज Confirm करणे | दि. २९ ते ३० ऑगस्ट, २०२३ |

**महत्त्वाच्या सूचनाः**

१. एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांकरीता Registration शुल्क रु. २००/- स्विकारून विद्यार्थ्यांचे Registration विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत सदर सुविधा उपलब्ध करून देता येणार नाही.

२. OTO Online Registration बाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

३. विभागीय कार्यालयाने निश्चित (Confirm) केलेल्या विद्यार्थ्यांनाच एक वेळ संधी घेऊन सत्रकर्म पूर्ण करता येईल.

४. एक वेळ संधी घेणा-या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण स्विकारणेबाबत-

- एक वेळ संधी घेणा-या Semester Pattern पद्धतीच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे सत्र ३ व सत्र ५ मधील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण हिवाळी परीक्षा – २०२३ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच

Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत. तसेच सत्र ४ व सत्र ६ मधील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण उन्हाळी परीक्षा – २०२४ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत.

- एक वेळ संधी घेणा-या Yearly Pattern पद्धतीच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे द्वितीय व तृतीय वर्षातील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण उन्हाळी परीक्षा – २०२४ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत.

५. एक वेळ संधीचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांनी मंडळाच्या नियमावलीतील RG-6 नुसार सत्रकर्म पूर्ण न केल्यास अशा विद्यार्थ्यांना Detained/Disallowed करावे व असे विद्यार्थी ज्यावेळेस पुढील वर्षाकरीता प्रवेशास पात्र होतील, त्यावेळेस त्यांनी पुढील वर्षात पुन्हा प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

६. एक वेळ संधी मिळणा-या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची व विद्यार्थ्यांचे अर्ज अभिलेखे (Record) ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच असे रेकॉर्ड आवश्यकतेनुसार सादर केले जातील, याबाबतचे हमीपत्र संस्थेने देणे आवश्यक आहे.

७. या व्यतिरिक्त मंडळाच्या संदर्भीय परिपत्रकान्वये दिलेल्या अटी लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

सहपत्र: १) अर्जाचा नमुना
२) हमीपत्राचा नमुना – विद्यार्थ्यांकरीता
३) हमीपत्राचा नमुना – संस्थाप्रमुखांकरीता

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत महितीसाठी:
मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व कार्यवाही साठी:
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय – मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद

**अर्जाचा नमुना**

(विद्यार्थ्यांने मंडळाच्या विभागीय कार्यालयात संस्थेमार्फत सादर करावा)

प्रति,
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय - *मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
(मार्फत – संस्थाप्रमुख)

विषय:- **उन्हाळी परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करुन देणेबाबत..**

संदर्भ :- मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/एकवेळ संधी/२०२३/५५७०, दिनांक १७.०८.२०२३

उपरोक्त संदर्भान्वये व विषयानुषंगाने *तिस-या सत्राचे/पाचव्या सत्राचे/द्वितीय/तृतीय वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्याची परवानगी मिळण्याकरिता मी, खाली सही करणार (विद्यार्थी) अर्ज सादर करीत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षा नियम **RG 4C** नुसार मी *तिस-या सत्रात/पाचव्या सत्रात/द्वितीय/तृतीय वर्षात प्रवेश घेण्यास अपात्र आहे. तथापि उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये, केवळ सत्रकर्म पूर्ण करण्यास एक वेळ संधी देण्यात आली असून मी ______________________ पदविका अभ्यासक्रमाच्या *द्वितीय/तृतीय वर्षात प्रवेश घेऊन सत्रकर्म पूर्ण करू *इच्छितो/इच्छिते. त्या करिता मला परवानगी द्यावी, ही विनंती.

मंडळाच्या परीक्षा नियमानुसार पात्र होईन तेव्हाच मला परीक्षेस बसण्याची संधी मिळेल, याबाबत मला संस्थेने जाणीव करून दिलेली आहे. तसेच सत्रकर्म पूर्ण करण्याबाबत मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील नियम RG-6 मला बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे. तसेच या सोबत हमीपत्र सादर करावयाचे आहे, याची मला जाणीव असून हमीपत्रातील सर्व बाबी मला मान्य आहेत.

*द्वितीय/तृतीय वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्याची एक वेळ संधी मला द्यावी, ही विनंती.

आपला/आपली विश्वासू

दिनांक-
स्थळ-

सही-
नांव -
नोंदणी क्र. -

**घोषणा पत्र**

मी घोषित *करतो/करते की, विद्यार्थ्यास संपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले असून सर्व संबंधित नियमांची माहिती करून देण्यात आली आहे. विद्यार्थी एक वेळ संधीचा लाभ घेण्यास उत्सुक आहे. त्या करिता त्याचा अर्ज सादर करीत आहे. तसेच ही संधी घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज अभिलेखे (Record) ठेवणेची जबाबदारी संस्था घेत आहे. तसेच आवश्यकतेप्रमाणे मागणी केल्यास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थेचा
शिक्का

सही -

प्राचार्यांचे नांव-

संस्थेचे नाव -

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

## UNDERTAKING
## विद्यार्थ्याने संस्थेत द्यावयाचे हमीपत्र

विषय:- **उन्हाळी परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करुन देणेबाबत..**

संदर्भ :- मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/एकवेळ संधी/२०२३/५५७०, दिनांक १७.०८.२०२३

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये तथा विषयानुषंगाने मी खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

१. सदरची एक वेळ संधी मी स्वेच्छेने स्विकारीत आहे.

२. माझा द्वितीय व तृतीय वर्षातील प्रवेश केवळ सत्रकर्म पूर्ण करण्याकरीता आहे व परीक्षा नियमानुसार मी परीक्षेस बसण्यास जेव्हा पात्र होईन तेव्हाच मला परीक्षा देता येईल.

३. *तिस-या/पाचव्या सत्राचे सत्रकर्म पूर्ण करण्यास मी असमर्थ ठरल्यास मला थोपविण्यात (Detained) येईल व *चौथ्या/सहाव्या सत्रात मला प्रवेश दिला जाणार नाही. तसेच *द्वितीय/ तृतीय वर्षातील सत्रकर्म पूर्ण करण्यास मी असमर्थ ठरल्यास मला थोपविण्यात (Detained) येईल व मला देण्यात आलेली एक वेळ संधी रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

४. एक वेळ संधी अंतर्गत पूर्ण केलेले सर्व विषयांचे सत्रकर्म Term Work/ Journal/ Drawing/ Project Report/ Project Model जतन करण्याची जबाबदारी माझी राहील. तसेच परीक्षेकरीता पात्र झाल्यानंतर Oral/Practical परीक्षेच्या वेळी सदर सत्रकर्म सादर करण्याची जबाबदारी माझी राहील.

५. मी संस्थेमध्ये आवश्यक ती शिस्त पाळेन. संस्थेच्या शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन करणार नाही.

६. माझ्या कडून नियमीत विद्यार्थ्यांना त्रास होईल असे कोणतेही वर्तन होणार नाही, जेणेकरून संस्थेच्या शिस्तीचा/नियमांचा भंग होईल असे मी केल्यास माझी ही संधी रद्द केली जाईल याची मला जाणीव आहे.

७. एकवेळ संधीची सुविधा घेत असताना भविष्यात माझा निकाल RHR राहणेची शक्यता आहे, याची मला कल्पना आहे. त्याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

सही –

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव –

नोंदणी क्र. –

अभ्यासक्रम -

स्थळ :-

दिनांक :-

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

## UNDERTAKING

### संस्था प्रमुखांनी विभागीय कार्यालयाकडे सादर करावयाच्या हमीपत्राचा नमुना

विषय:- **उन्हाळी परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करुन देणेबाबत..**

संदर्भ :- मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/एकवेळ संधी/२०२३/५५७०, दिनांक १७.०८.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळाने संदर्भात नमुद केलेल्या परिपत्रकानुसार आमच्या संस्थेतील खालील तक्त्यामधील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये द्वितीय व तृतीय वर्षासाठी एक वेळ संधी अंतर्गत (One Time Opportunity) शिक्षण घेण्याचा विकल्प सादर केलेला आहे. तो खालील तक्त्यात दर्शविला आहे.

| अ.क्र. | नोंदणी क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | अभ्यासक्रम | एक वेळ संधीचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सत्रनिहाय / वर्षनिहाय पूर्वइतिहास |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**एकूण विद्यार्थी –** **एकूण शुल्क – रु.**

मी, ______________________ प्राचार्य, ______________________ खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

१. वरील तक्त्यामधील नमुद सर्व विद्यार्थी द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षांसाठी पात्र होईपर्यंत तथा परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, त्यांचे या शैक्षणिक वर्षातील सेशनल/टर्मवर्क/प्रात्यक्षिकांचे मंडळाच्या निकषांप्रमाणे विषयनिहाय अभिलेखे (Record) संस्था विहित पध्दतीने जतन करेल. तसेच आवश्यकतेप्रमाणे मंडळाने मागणी केल्यास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

२. एक वेळ संधी घेणा-या विद्यार्थ्यांनी सत्र ३ व सत्र ५ तसेच सत्र ४ व सत्र ६ चे सत्रकर्म पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास विद्यार्थ्यांना Detained करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

३. अ) एक वेळ संधी घेणा-या Semester Pattern पद्धतीच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे सत्र ३ व सत्र ५ मधील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण हिवाळी परीक्षा – २०२३ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत. तसेच सत्र ४ व सत्र ६ मधील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण उन्हाळी परीक्षा – २०२४ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत.

ब) एक वेळ संधी घेणा-या Yearly Pattern पद्धतीच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे द्वितीय व तृतीय वर्षातील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण उन्हाळी परीक्षा – २०२४ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत.

नमूद केलेल्या वरील परीक्षेव्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत OTO विद्यार्थ्यांचे अंतर्गत विषयाचे गुण मंडळाकडून स्विकारले जाणार नाहीत. ज्या वेळेस विद्यार्थी द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षेस पात्र होईल, त्यावेळेस सदर गुण मंडळाद्वारे विद्यार्थ्यास गुणपत्रिकेत प्रदान करण्यात येतील याची मला जाणीव आहे.

स्थळ: (संस्थेचा शिक्का) स्वाक्षरी:-

दिनांक : प्राचार्यांचे नावः-

संस्थेचे नावः-